# MAHARASHTRA ACT No. XLIX OF 1977

## THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SUGAR FACTORIES (UNDER ERECTION AND CERTAIN OTHERS) (POSTPONEMENT OF ELECTIONS) ACT, 1977.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ९ नोव्हेंबर १९७७ रोजी मिळाली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XLIX OF 1977

AN ACT TO PROVIDE FOR POSTPONEMENT OF ELECTIONS TO COMMITTEES OF CERTAIN CO-OPERATIVE SUGAR FACTORIES UNDER ERECTION, FOR FACILITATING EARLY COMPLETION OF THEIR ERECTION PROGRAMMES AND STARTING OF TRIAL CRUSING SEASONS, AND OF CERTAIN OTHER CO-OPERATIVE SUGAR FACTORIES, WHOSE ELECTIONS COULD NOT BE HELD DUE TO THE RAINY SEASON.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक १५ नोव्हेंबर १९७७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९

**उभारणी चालू असलेल्या विवक्षित सहकारी साखर कारखान्यांचे उभारणी कार्यक्रम लवकर पूर्ण करणे सोयीचे करण्यासाठी व चाचणीवजा गाळणी हंगाम (क्रशिंग सीझन्स) सुरू करण्यासाठी त्या सहकारी साखर कारखान्यांच्या आणि पावसाळ्यामुळे ज्यांच्या निवडणुका घेणे शक्य झाले नाही अशा विवक्षित इतर सहकारी साखर कारखान्यांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३-म अन्वये सहकारी साखर कारखाने हे विनिर्दिष्ट संस्था म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत आणि या कारखान्यांच्या निवडणुका उक्त अधिनियमाचे प्रकरण अकरा-क याद्वारे किंवा तदन्वये घालून देण्यात आलेल्या रीतीने जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली घेणे आवश्यक आहे ;

१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

आणि ज्याअर्थी, काही सहकारी साखर कारखान्यांच्या समित्यांच्या सदस्यांचा किंवा प्रशासकांचा पदावधी समाप्त झालेला होता किंवा समाप्त होणार होता ;

आणि ज्याअर्थी, ज्यांची उभारणी चालू आहे अशा सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत निवडणुका घेतल्यामुळे या संस्थांच्या व्यवस्थापकवर्गाचे आणि सदस्यांचे लक्ष विनाकारण विचलित झाले असते व त्यामुळे त्यांच्या उभारणी कार्यक्रमांत किंवा चाचणीवजा गाळणी हंगाम सुरू करण्याच्या तारखांत अडथळे आले असते व त्या मागेपुढे ढकलल्या गेल्या असत्या ;

आणि ज्याअर्थी, अशा तीन संस्थांना त्यांचे उभारणी कार्यक्रम शक्य तितक्या लवकर पूर्ण करणे किंवा त्यांचे चाचणीवजा गाळणी हंगाम शक्य तितक्या लवकर सुरू करणे शक्य व्हावे यासाठी या तीन संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका व पोट-निवडणुका २० ऑक्टोबर १९७८ ही तारीख धरून त्या तारखेपर्यंत लांबणीवर टाकणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (आणीबाणीमुळे निवडणुका लांबणीवर १९७५
टाकणे) अधिनियम, १९७५ याच्या कलम (१), पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेला, निवडणुका चा
लांबणीवर टाकण्याचा कालावधी हा, काही इतर सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत, महा-
२१ सप्टेंबर १९७७ रोजी समाप्त होणार होता ; राष्ट्र

आणि ज्याअर्थी, अशा बारा संस्थांच्या निवडणुकांबाबतची कार्यवाही पूर्ण करणे व पावसाळी अधि-
हंगामातील शेतीच्या कामामध्ये व्यत्यय न येऊ देता निवडणुकांमध्ये भाग घेणे सदस्यांना सोयीचे नियम
करून देणे जिल्हाधिकाऱ्यांना शक्य व्हावे यासाठी या बारा संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका व क्रमांक
पोट-निवडणुका २० ऑक्टोबर १९७७ ही तारीख धरून, त्या तारखेपर्यंत लांबणीवर टाकणे इष्ट होते ; ४३.

आणि ज्याअर्थी, निवडणुका अशा रीतीने लांबणीवर टाकल्याच्या परिणामी, या सर्व संस्थांच्या समित्यांच्या सदस्यांचा किंवा प्रशासकांचा पदावधी वाढविणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, पूर्वोक्तप्रमाणे, निवडणुका लांबणीवर टाकणे व पदावधी वाढविणे यासाठी १९७७
व त्याच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करण्यासाठी तावडतोब कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक चा
झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती महा-
आणि म्हणून त्यांनी १ सप्टेंबर १९७७ रोजी, महाराष्ट्र सहकारी साखर कारखाने (उभारणी राष्ट्र
चालू असलेले व विवक्षित इतर) (निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७७ हा प्रख्यापित अध्या-
केला होता ; देश

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमामध्ये रूपांतर करणे इष्ट क्रमांक
आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात ५.
येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व कालावधी. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी साखर कारखाने (उभारणी चालू असलेले व विवक्षित इतर) (निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७७ असे म्हणता येईल.

(२) तो १ सप्टेंबर १९७७ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल ;

(३) हा अधिनियम २० ऑक्टोबर १९७८ ही तारीख धरून त्या तारखेपर्यंत किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचित करील अशा अगोदरच्या तारखेपर्यंत अंमलात राहील व नंतर समाप्त होईल. हा अधिनियम समाप्त झाल्यानंतर मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे जणू काही तो महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आल्याप्रमाणे लागू होईल.

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— १९०४
(अ) "प्रशासक", "समिती" व "संस्था" यांचे, सहकारी संस्था अधिनियमामध्ये त्यांना चा
जे अर्थ नेमून देण्यात आलेले असतील तेच अर्थ असतील ; अधि-
(ब) "उभारणी चालू असलेला सहकारी साखर कारखाना" म्हणजे, अनुसूची एकमध्ये नियम
विनिर्दिष्ट करण्यात आलेला कोणताही सहकारी साखर कारखाना आणि "अन्य सहकारी साखर क्रमांक
कारखाना" म्हणजे, सहकारी संस्था अधिनियमान्वये नोंदणी केलेला किंवा नोंदणी केल्याचे मानण्यात १.
येणारा अनुसूची दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही सहकारी साखर कारखाना ;

१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(क) "सहकारी संस्था अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

**उभारणी चालू असलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे.**

३. सहकारी संस्था अधिनियम आणि तदन्वये करण्यात आलेले नियम व उप-विधी यांमध्ये किंवा महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (आणीबाणीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) एखाद्या बाबतीत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला असला तरी किंवा एखाद्या बाबतीत निवडणुकीला प्रारंभ झालेला असला तरी मतदान घेण्यात आलेले नसेल तर, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून, २० ऑक्टोबर १९७८ ही तारीख धरून त्या तारखेपर्यंतच्या किंवा कलम १, पोट-कलम (३) अन्वये राज्य शासन अधिसूचित करील अशा अगोदरच्या तारखेपर्यंतच्या कालावधीमध्ये (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा करण्यात आला आहे) उभारणी चालू असलेल्या कोणत्याही सहकारी साखर कारखान्याच्या समितीच्या निवडणुका किंवा समितीमधील कोणतेही नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी, निवडणुका घेण्यात येणार नाहीत, आणि असा कोणताही कार्यक्रम किंवा तदन्वये करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून रद्द होईल ;

(ब) जे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी पदावर असतील (मग त्यांचा पदावधी उक्त तारखेपूर्वी संपलेला असो किंवा त्या तारखेला किंवा त्या तारखेनंतर उक्त कालावधीमध्ये केव्हाही संपणार असो) असे, अशा संस्थांच्या समित्यांचे (निवडून आलेले, नियुक्त केलेले, नामनिर्देशित किंवा स्वीकृत) सदस्य, किंवा अशा संस्थांचा कारभार चालविण्यासाठी नियुक्त केलेले प्रशासक यांचा पदावधी (कोणत्याही वाढविलेल्या पदावधीसह) वाढविण्यात आला असल्याचे किंवा, यथास्थिती वाढवावयाचा असल्याचे मानण्यात येईल; आणि असे सदस्य किंवा, यथास्थिती, प्रशासक उक्त कालावधीमध्ये पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

**इतर सहकारी साखर कारखान्यांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे.**

४. सहकारी संस्था अधिनियम आणि तदन्वये करण्यात आलेले नियम आणि उप-विधी यांमध्ये किंवा महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (आणीबाणीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) एखाद्या बाबतीत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला असला तरी किंवा एखाद्या बाबतीत निवडणुकीला प्रारंभ झालेला असला तरी, मतदान घेण्यात आलेले नसेल, तर या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून, २० ऑक्टोबर १९७७ ही तारीख धरून त्या तारखेपर्यंतच्या कालावधीमध्ये (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश "पूर्वोक्त कालावधी" असा करण्यात आला आहे) इतर कोणत्याही सहकारी साखर कारखान्याच्या समितीच्या कोणत्याही निवडणुका किंवा समितीमधील कोणतेही नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी निवडणुका घेण्यात येणार नाहीत, आणि असा कोणताही कार्यक्रम किंवा तदन्वये करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही या अधिनियमाच्या प्रारंभीच्या तारखेपासून रद्द होईल ;

(ब) जे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी पदावर असतील (मग त्यांचा पदावधी उक्त तारखेपूर्वी संपलेला असो किंवा त्या तारखेला किंवा त्या तारखेनंतर पूर्वोक्त कालावधीमध्ये केव्हाही संपणार असो) असे, अशा संस्थांच्या समित्यांचे (निवडून आलेले, नियुक्त केलेले, नामनिर्देशित किंवा स्वीकृत) सदस्य किंवा अशा संस्थांचा कारभार चालविण्यासाठी नियुक्त केलेले प्रशासक यांचा पदावधी (कोणत्याही वाढविलेल्या पदावधीसह) वाढविण्यात आला असल्याचे किंवा, यथास्थिती, वाढवावयाचा असल्याचे मानण्यात येईल ; आणि असे सदस्य किंवा यथास्थिती प्रशासक पूर्वोक्त कालावधीमध्ये पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

५. कलमे ३ व ४ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक सहकारी साखर कारखान्याच्या समितीला, राजीनाम्यामुळे, मृत्युमुळे किंवा अन्य कारणाने निर्माण झालेले तिच्या सदस्याचे कोणतेही रिक्त पद भरण्यासाठी, जो याबाबतीत रीतसर अर्हताप्राप्त आहे अशा कोणत्याही सदस्यास स्वीकृत करून घेण्याची शक्ती असेल.

६. लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे किंवा इष्ट आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्याला, शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे, उभा[illegible] चाल असलेल्या कोणत्याही सहकारी साखर कारखान्यांच्या किंवा इतर कोणत्याही साखर का[illegible] समितीला किंवा तिच्या एका किंवा अधिक सदस्यांना काढून टाकता येईल आणि काढून ट[illegible] समितीच्या जागी एखाद्या नवीन समितीची किंवा एका किंवा अधिक प्रशासकांची किंवा, यथास्थिती, काढून टाकलेल्या सदस्यांच्या जागी एका किंवा अधिक सदस्यांची नियुक्ती करता येईल. अशा व्यक्तींची नियुक्ती, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी आणि अशा अटींना व शर्तींना अधीन राहून करण्यात येईल :

परंतु संबंधित सदस्याला किंवा सदस्यांना त्याच्याविरुद्ध किंवा त्यांच्याविरुद्ध करण्याच्या योजिलेल्या कार्यवाहीबाबत राज्य शासनाकडे अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही.

७. कलमे ३ किंवा ४ अन्वये ज्यांचा पदावधी वाढविण्यात आल्याचे मानण्यात आले आहे किंवा, यथास्थिती, वाढविण्यात आला आहे असे कोणत्याही सहकारी साखर कारखान्यांच्या समितीचे सर्व सदस्य आणि सर्व प्रशासक अनुक्रमे त्यांच्या वाढविलेल्या संपूर्ण कालावधीतही असे सदस्य म्हणून किंवा यथास्थिती असे प्रशासक म्हणून सर्व शक्तींचा वापर करण्यास आणि सर्व कर्तव्ये आणि कार्ये पार पाडण्यास सक्षम असतील ; आणि पदावधी वेळेवर वाढविण्यात आला नव्हता किंवा तो अन्यथा योग्य रीतीने वाढविण्यात आला नव्हता किंवा वाढविलेल्या कालावधीमध्ये, समितीला, सदस्यांना किंवा प्रशासकांना, समितीच्या सदस्याच्या किंवा यथास्थिती प्रशासकाच्या सर्व शक्ती वापरता येत नव्हत्या आणि तिची/त्यांची सर्व कर्तव्ये आणि कार्ये पार पाडता येत नव्हती, याच केवळ कारणास्तव, अशा कोणत्याही सदस्याने किंवा प्रशासकाने संबद्ध कालावधीमध्ये केलेल्या कोणत्याही कृती अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही किंवा त्याबाबतीत कोणत्याही न्यायालयात हरकत घेण्यात येणार नाही.

८. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचित करावयाच्या (कलम ३ किंवा यथास्थिती, कलम ४ अन्वये वाढविण्यात आलेला कालावधी संपण्याच्या तारखेपूर्वीच्या असलेल्या) तारखेनंतर, कलम ३, किंवा यथास्थिती, कलम ४ अन्वये ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला आहे अशा संबंधित विद्यमान समित्यांचा आणि प्रशासकांचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून, नवीन समित्यांची स्थापना करण्यासाठी, सहकारी संस्था अधिनियमाच्या उपबंधांनुसार आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांनुसार आणि उप-विधींनुसार व्यवस्था करण्यात येईल.

९. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीजकरून सहकारी संस्था अधिनियम सर्व बाबतीत संबंधित सहकारी साखर कारखान्यांना लागू होईल.

---

भाग आठ] महार

१०. या अधिनि
कोणत्याही गोष्टीमुळे
अडचण उद्भवल्यास
करण्यासाठी जी गो

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३. — ११. या अधिनि
मुळे निवडणुका ला
अनुसूची एक व दो
बंद होईल.

१९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५. — १२. (१) म
(निवडणुका लांबणी
(२) अध्यादेश
आलेली/केलेली को
या अधिनियमाच्या
आल्याचे मानण्यात

१. नाशिक
२. कर्मवीर
जिल्हा नाशिक.
३. दौलत
कोल्हापूर.

१. श्री ज
अहमदनगर.
२. आंबेज

१०. या अधिनियमाचे कोणतेही उपबंध अंमलात आणताना किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा सहकारी संस्था अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनाला, प्रसंग उद्भवेल त्याप्रमाणे, आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी जी गोष्ट करणे आवश्यक असल्याचे दिसून येईल अशी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करणे.

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३. ११. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून, महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (आणीबाणी-मुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ हा या अधिनियमाच्या सोबत जोडलेल्या अनुसूची एक व दोनमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सहकारी साखर कारखान्यांना लागू असण्याचे बंद होईल. ज्या सहकारी साखर कारखान्यांना हा अधिनियम लागू होतो त्यांना सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ लागू असण्याचे बंद होणे.

१९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५. १२. (१) महाराष्ट्र सहकारी साखर कारखाने (उभारणी चालू असलेले व विवक्षित इतर) (निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७७ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ति.

(२) अध्यादेश अशा रीतीने निरसित केलेला असला तरी, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली/केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृति (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यासुद्ध) ही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आल्याचे किंवा केल्याचे किंवा यथास्थिति काढण्यात आल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची एक

[कलम २ चा खंड (ब) पहा]

१. नाशिक सहकारी साखर कारखाना मर्यादित, पळसे, जिल्हा नाशिक.

२. कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखाना मर्यादित, रानवड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

३. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, यशवंतनगर, तालुका चंदगड, जिल्हा कोल्हापूर.

## अनुसूची दोन

[कलम २ चा खंड (ब) पहा]

१. श्री जगदंबा सहकारी साखर कारखाना मर्यादित, मु., पो. राशिन, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२. आंबेजोगाई सहकारी साखर कारखाना मर्यादित, आंबेजोगाई, जिल्हा बीड.

३. सह्याद्री सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरवडे, तालुका कराड, जिल्हा सातारा.

४. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना मर्यादित, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

५. कन्नड सहकारी साखर कारखाना मर्यादित, कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

६. विनायक सहकारी साखर कारखाना मर्यादित, परसोडा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

७. मराठवाडा सहकारी साखर कारखाना मर्यादित, डोंगरकडा, तालुका कळमनुरी, जिल्हा परभणी.

८. बेलगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, भोरस, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव.

९. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना मर्यादित, भेंडे बुद्रुक, तालुका नेवासे, जिल्हा अहमदनगर.

१०. गंगापूर सहकारी साखर कारखाना मर्यादित, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

११. सासवडमाळी सहकारी साखर कारखाना मर्यादित, माळीनगर, जिल्हा सोलापूर.

१२. आदिनाथ सहकारी साखर कारखाना मर्यादित, जिल्हा सोलापूर.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.